# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २७ जुलै, २०१५ / श्रावण ५, १९३७ ( शके )**

**(१) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
**(२) आदिवासी विकास मंत्री**
**(३) उद्योग मंत्री**
**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
**(५) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६४**

---

**राज्यातील मान्यता प्राप्त अपंग शाळांमधील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१) * ७५९६ डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपंग विद्यार्थ्यांसाठीच्या मान्यता प्राप्त शाळांमध्ये अनेक पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने तातडीने ही पदे भरण्यासाठी काय कार्यवाही केली वा करणार आहे,

(३) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेल्या आदेशानुसार आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांच्या स्तरावर समायोजनाची पदनिहाय यादी तयार करण्यात येत असून, रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आर्थिक अडचणीत असलेल्या साखर कारखान्यांना केंद्र व राज्य शासनाकडून आर्थिक मदत उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२) * ७००३ श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.राहुल नार्वेकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.राजेंद्र जैन, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, श्री.अनिल तटकरे, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी कारखान्यांच्या पिळवणुकीमुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांसाठी सहकार महर्षी विठ्ठलराव विखे पाटील यांनी सहकारी तत्वावर सुरु केलेले साखर कारखाने सद्या आर्थिक अडचणीत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास ऊस उत्पादकांना रास्त व किफायतशीर किमंतीनुसार (एफआरपी) मिळणे अपेक्षित असलेल्या सुमारे १७ हजार कोटी रुपयांपैकी ४ हजार कोटी रुपये अद्याप दिले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संकटात असलेल्या कारखान्यांना आर्थिक अडचणींतून बाहेर काढण्यासाठी केंद्र सरकारने ५० लाख टन साखरेचा साठा करावा तसेच ऊसाच्या हमी भावाप्रमाणेच साखरेलाही हमीभाव देण्याची मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे माहे एप्रिल २०१५ मध्ये केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर साखर उद्योगाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी वाजवी दराबाबत एफआरपी कायदा बदलण्याची आवश्यकता असल्याने याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, केंद्र शासनाने राज्य शासनाला आतापर्यंत किती मदत केली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याप्रकरणी निर्णय केव्हापर्यंत घेण्यात येईल ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सन २०१४-१५ च्या हंगामाचे सुरुवातीस प्रतिक्विंटल रु. २६००-२७०० प्रमाणे साखरेला असणारा दर सद्य:स्थितीत प्रतिक्विंटल रु. २१००-२२०० पर्यन्त घटलेला आहे. त्यामुळे राज्यातील साखर उदयोगाला निधी उपलब्धतेचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

(२) दिनांक ३०/६/२०१५ अखेर FRP प्रमाणे देय ऊस देयके रु.१९०५८.८७ कोटी असून त्यापैकी साखर कारखान्यांनी रु.१५९१९.८३ कोटी ऊस देयके ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना अदा केलेली आहेत आणि रु.३१३९.०४ कोटी ऊस देयके थकित आहेत.

(३) व (४) राज्यातील साखर उद्योगास आर्थिक सहाय्य देण्यासाठी दि.१०/४/२०१५ आणि दि.१५/४/२०१५ चे पत्रान्वये मा. पंतप्रधान आणि मा. केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना कच्च्या साखर निर्यातीस अनुदान, अबकारी कर्ज, कच्चा साखरेच्या आयात शुल्कात वाढ, इथेनॉल मिश्रण कार्यक्रम, बफर स्टॉक निर्मिती, मुदत कर्जाची पुनर्रचना, ऊस विकास निधी (SDF) इत्यादि मुद्यांबाबत, धोरणात्मक निर्णय होणेस विनंती केली आहे.

ऊस नियंत्रण आदेश १९६६ हा कायदा केंद्र शासनाचा आहे.

(५) केंद्र शासनामार्फत राज्यातील साखर उद्योगास खालीलप्रमाणे मदत करण्यात आली आहे :-

१) FRP अदा करणेकरिता केंद्र शासनाने सन २०१४-१५ साठी रु. ६००० कोटीचे पॅकेज जाहीर केलेले असून त्यामधून राज्याला रु.१९८२ कोटी मिळणे अपेक्षित आहे.

२) केंद्र शासनाने दि. २७/२/२०१५ च्या अधिसूचनेनुसार १४ लाख मे.टन कच्च्या साखरेच्या निर्यातीसाठी प्रति मे.टन रु.४०००/- प्रमाणे अनुदानाचा निर्णय घेतला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार सुविधा मिळत नसल्याबाबत**

**(३) * ७३६४ श्री.विजय गिरकर, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ७१ आश्रमशाळांपैकी २२ आश्रमशाळांची पाहणी यशदा या संस्थेच्या वतीने केली असता विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा घसरलेला दर्जा तसेच सकस आहार मिळत नसल्याने आश्रमशाळांमधील दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी २६ टक्के मुलांची गळती होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ७,४६,००० अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येसाठी केवळ ७१ आश्रमशाळा असून ९ ते १० अनुसूचित जमातीसाठी एक शाळा अशी दयनीय अवस्था असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे मद्यपान करून आश्रमशाळेत येतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, आश्रमशाळांचा दर्जा सुधारणे व मद्यपान करून शाळेत येणाऱ्यांवर शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्रात सन २०११-१२ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जमातीची लोकसंख्या १०५.१० लाख एवढी आहे. अनुसूचित जमाती क्षेत्रात ५००० ते ७००० लोकसंख्येस एक आश्रमशाळा हा निकष आहे. तर अतिदुर्गम भागात विखुरलेल्या वस्तीस ३००० ते ५००० लोकसंख्येच्या क्षेत्रासाठी एक आश्रमशाळा असा निकष आहे. त्यानुसार ५५२ शासकीय व ५५६ अनुदानित आश्रमशाळा मंजूर केलेल्या आहेत. त्यामध्ये अनुक्रमे १,९६,३५७ व २,५३,८९१ असे एकूण ४,५०,२४८ विद्यार्थी वास्तव्य करुन शिक्षण घेत आहे.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) यशदा संस्थेच्या अहवालात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यात दारु पिण्याचे प्रमाण अधिक असल्याबाबत कोणताही उल्लेख आढळून येत नाही. तथापि, त्यांनी त्यांच्या अहवालात शाळा परिसरात तसेच शाळेच्या वेळेत शिक्षक किंवा शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मद्यपान करुन येण्यास प्रतिबंध असावा अशी शिफारस केली आहे.

शासकीय/अनुदानित आश्रमशाळेत कार्यरत असणाऱ्या शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना शाळेच्या वेळेत परिसरात आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसमोर धुम्रपान, मद्यपान, तंबाखु, गुटखा इत्यादी अमली पदार्थाचे सेवन करु नये व गैरवर्तन करु नये याबाबत परिपत्रकीय सुचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**खामगांव (जि.बुलडाणा) येथील म.रा.औ.वि.महामंडळ (एम.आय.डी.सी.) च्या वाढीव जागेच्या प्रस्तावाला मंजुरी मिळणेबाबत**

**(४) * ८१४४ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४०४४ ला दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (ता.खामगांव, जि.बुलडाणा) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) च्या वाढीव जागेच्या प्रस्तावाला मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावाची सद्य:परिस्थिती काय आहे,

(३) सदर प्रस्तावाला शासनाने तात्काळ मंजुरी देऊन वाढीव जागा अधिग्रहीत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अतिरिक्त खामगांव औद्योगिक क्षेत्रासाठी मौजे सुटाळा, ता.खामगांव, जि.बुलढाणा येथील २५४.४६ हे आर क्षेत्र अधिसूचित करण्यासंबंधीच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे. तथापि, केंद्र शासनाचा नविन भूसंपादन कायदा, २०१३ नुसार भूसंपादन करण्यास तांत्रिक अडचणी येत होती, तथापि, विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात आले असून, सदर क्षेत्र आधिसूचित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ऊंझा-जिरा-मिरा-वाढोडा-करंजी (ता.पांढरकवडा, जि.यवतमाळ) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(५) * ७६०० श्री.हरिसिंग राठोड, श्री.सजंय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऊंझा-जिरा-मिरा-वाढोडा-करंजी (ता.पांढरकवडा, जि.यवतमाळ) हा रस्ता खड्डेमय झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची डागडुजी व दुरुस्ती मागील २ ते ३ वर्षापासून करण्यात आली नसून याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग, पांढरकवडा यांचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्ता दुरुस्ती न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच रस्ता केव्हापर्यंत दुरुस्त करण्यात येईल,
(४) अद्याप, कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्नांकित रस्त्याची एकूण लांबी १६.२०० कि.मी आहे. पैकी १०.७०० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे.

२ कि.मी. लांबीत खड्डे पडले असून सद्य:स्थितीत खड्डे भरण्याचे काम प्रगतीत आहे.

३,५०० कि.मी. लांबीतील खड्डे भरण्याचे काम प्रगतीत असून रस्ता वाहतूकीकरिता सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

सदर ३,५०० कि.मी. लांबीतील रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून निधी, निकष व प्राथम्यक्रमानुसार काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## बारवी धरणाची उंची वाढविणे तसेच प्रकल्पबाधित नागरिकांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(६) * ६८६६ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली मनपा क्षेत्रातील पाणीपुरवठा संदर्भात महाराष्ट्र विधान परिषदेत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने मा.जलसंपदा मंत्री यांनी एप्रिल, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात आयोजित केलेल्या बैठकीत बारवी धरणाची उंची वाढवल्यास अतिरिक्त पाणीसाठा साठवून ते महानगरपालिकांना देणे शक्य होईल असे निर्देशित केले होते, हे खरे आहे काय,
(२) तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने बारवी धरणातील पाण्यावर वीज निर्मिती प्रकल्पाचे काम केल्याने जांभूळ जलशुध्दीकरण प्रकल्पासाठी लागणाऱ्या विजेच्या एक तृतीअंश वीज या प्रकल्पातून तयार होणार असून सदर वीज निर्मितीमुळे मंडळाच्या कोट्यवधी रुपयांची बचत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या धरणाची उंची वाढविणे व मुरबाड तालुक्यातील सुमारे ७०० ते ८०० बाधित घरांच्या स्थलांतरणाबाबतचा अहवाल दिनांक २० एप्रिल, २०१५ पर्यंत सरकारला सादर करणे आवश्यक असून या धरणामुळे विस्थापित होणाऱ्या नागरिकांचे पुनर्वसन न झाल्याने सदरहू प्रकल्पाचे काम प्रलंबित आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त स्थलांतरणाबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला असल्यास, बारवी धरणाची उंची वाढविणे व प्रकल्पबाधितांचे स्थलांतरण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे,

(२) हे अंशत: खरे आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामर्फे बारवी धारणातील पाण्यावर वीजनिर्मिती करण्याच्या प्रकल्पाचे काम दोन टप्प्यामध्ये होणार असून जांभुळ जलशुध्दीकरण केंद्रासाठी सध्या १५ मेगावॅट एवढी विजेची गरज आहे. यापैकी जलविद्युत निर्मिती टप्पा क्र. १ द्वारे २.२५ मेगावॅट टप्पा, क्र.२ मध्ये २.२५ अशी एकूण ४.२५ मेगावॅट एवढी विजनिर्मिती अपेक्षित आहे. यानुसार महामंडळाच्या सद्य:स्थितीत वीज वापराच्या सरासारी एक पृष्ठांश (१/६) वीज प्रथम टप्प्यात उपलब्ध होणार आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

तथापि, धरणची उंची वाढविणे, त्याअनुषंगाने कराव्या लागणाऱ्या पुनर्वसन कामांच्या प्रगतीबाबतच्या आढाव्यासंदर्भात मा.मंत्री (उद्योग) यांच्याकडे दि. २७/४/२०१५ रोजी बैठक घेण्यात आली होती. त्याअनुषंगाने बारावी धरणाचे तिसऱ्या टप्प्यातील प्रत्यक्ष धरणाची नॉन ओव्हर फ्लो सेक्शनची उंची वाढविण्याचे काम पुर्ण करण्यात आले आहे. धरणाच्या तिसऱ्या टप्प्यातील जोडणीकडील भागाची उंची वाढविण्याचे व त्यावर स्वयंचलित दरवाजे बसविण्याचे काम प्रगतीवथावर आहे. तसेच २ टी.एम.सी पाणी साठा होईल इतपत धरणाचे काम पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

(५) माहे, ऑगस्ट २०१४ मध्ये अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या पुरसदृश्य परिस्थितीमुळे स्थानिक ग्रामस्थांच्या विरोधामुळे नवीन गावठाणांतील विकास कामे बंद पडली आहेत. त्यामुळे पुनर्वसन गावठाणाची विकास कामे विहित मुदतीत पुर्ण होऊ शकलेली नाहीत. तसेच मौजे, तोंडली येथील ग्रामस्थांच्या पुनर्वसन कामास असलेला विरोध आजही कायम आहे.

-----------------

**राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील शिक्षकांना वेतन मिळाले नसल्याबाबत**

**(७) * ७२९५ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.मितेश भांगडिया, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.सुधीर तांबे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.राजेंद्र जैन :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत येत असलेल्या विमुक्त जाती भटक्या जमातीच्या उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील शिक्षकांना सन २००८ पासून आजपावेतो वेतन मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) या शाळांना पहिल्या वर्षापासून १०० टक्के अनुदान मिळावे याकरीता मागील ४ वर्षापासून शिक्षक संघटनांच्या वतीने आंदोलन करण्यात येत आहे, तसेच नागपूर येथील हिवाळी अधिवेशन (२०१४) दरम्यान सामाजिक न्याय व समाजकल्याण मंत्रालयाने मार्च पर्यंत या शाळांतील शिक्षकांचा प्रश्न निकाली काढू असे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शाळांना आजपावेतो वेतन अनुदान न देण्याची कारणे काय आहेत,

(४) शासन यावर तातडीने निर्णय घेणार आहे काय व केव्हा पर्यंत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२), (३) व (४) विजाभज उच्च माध्यमिक आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदनिर्मितीचा व वेतनाचा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीच्या विचारार्थ सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावासंदर्भात उच्चस्तरीय समितीने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या माहितीसह प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**देसाईगंज आणि चार्मोशी (जि.गडचिरोली) येथे औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना होऊन एकही उदयोग सुरु न झाल्याबाबत**

**(८) * ७४४० श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात मोठया प्रमाणावर खनिज संपत्ती असून शासनाने देसाईगंज आणि चामोर्शी येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ निर्माण करुनही अद्यापही एकाही ठिकाणी उद्योग उभारण्यात आले नसल्याचे दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरात मोठया प्रमाणात खनिज संपत्ती असूनही औद्योगीक धोरण न राबविण्यांचे कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) वडसा (देसाईगंज) येथे औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी निवडलेले ४५९.०६ हे. आर. क्षेत्र हे वन विभागाच्या ताब्यात असून सदर जमिनीस वनसंवर्धन अधिनियम १९८० लागू होत असल्याने सदरची जमिन महामंडळाकडे हस्तांतरीत झालेली नाही.

चामोर्शी तालुक्यातील औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी मौ. आलापल्ली, आष्टी (नोकेवाडा), नोकेवाडा (रिठ) व इल्लूर येथील १९७.०२ हे. आर. खाजगी व ६.६९ हे. आर. सरकारी क्षेत्र अधिसुचित केले असून खाजगी क्षेत्र संपादीत करण्यासाठी खातेदारांसोबत नुकसान भरपाईचे दर ठरविण्याबाबत कार्यवाही सुरु आहे व मौजे वाघोली, दोटकुली आणि खंडाळा येथे औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी ३१८.९६ हे. आर. खाजगी व १९.९७ हे.आर. सरकारी अशी एकूण ३३८.९३ हे. आर. क्षेत्र अधिसूचित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. तसेच वडसा (देसाईगंज) आणि चामोर्शी तालुक्यातील सदर औदयोगिक क्षेत्रासाठी भूसंपादनाची कार्यवाही अद्याप अंतिम झालेली नसल्यामुळे तेथे उद्योग उभारण्याचा सध्या प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**येवला (जि.नाशिक) येथे आदिवासी विकास विभागाच्या शासकीय वसतिगृह इमारतीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत**

**(९) * ८०५२ श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.संदिप बाजोरिया, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथे आदिवासी विकास विभागाच्या शासकीय वसतिगृह इमारतीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील २३ शासकीय वसतिगृह इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे माहे जुलै, २०१३ पासून प्रशासकीय मान्यतेअभावी शासनाकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांचे वसतीगृहांअभावी होणारे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी प्रश्न भाग (१) व भाग (२) बाबत शासनामार्फत कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.
(२) सद्य:स्थितीत शासनस्तरावर एकूण ६४ वसतिगृह इमारत बांधकामाचे आराखडे प्राप्त झाले असून त्यापैकी २६ अंदाजपत्रके सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तांत्रिक मान्यतेसाठी पाठविण्याची कार्यवाही या विभागामार्फत सुरु आहे. १६ अंदाजपत्रके सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तांत्रिक मान्यतेसाठी पाठविलेली आहेत. तसेच उर्वरित २२ अंदाजपत्रकांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तांत्रिक मान्यता मिळालेली आहे, अशा अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) शासनास प्राप्त सर्व अंदाजपत्रकांवर प्रशासकीय मान्यता देण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील जात पडताळणी समित्यांवर महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती न केल्याने जात प्रमाणपत्र देण्याच्या कामात होणारा विलंब

**(१०) * ६९०६ श्री.अनंत गाडगीळ, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील जात पडताळणी समित्यांवर महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती न केल्यामुळे जिल्हावार जात पडताळणी समित्यांचे कामकाज सुरु झालेले नसल्याचे दिनांक २९ एप्रिल, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राखीव जागांवर प्रवेश, नोकरी, प्रमोशन व निवडणूकांतील उमेदवारांना जातीचे प्रमाणपत्र आणि जात पडताळणीचे प्रमाणपत्र सादर करावे लागते, सद्य:स्थितीत जात पडताळणी प्रमाणपत्रांसाठी अनेक अर्ज आल्याने प्रमाणपत्रे देण्याचे काम रखडले असल्याचे उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

शासनाने सध्याचा १५ विभागीय जात प्रमाणपत्र समित्यांऐवजी जिल्हानिहाय ३६ समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला असून, जिल्हानिहाय समित्यांसाठी पदनिर्मिती प्रस्तावित असल्याने, अदयाप सदर समित्या कार्यान्वित झालेल्या नाहीत.
(२) नाही.

मे, २०१५ अखेर पुणे समितीकडे केवळ १६२८ प्रकरणे प्रलंबित आहेत.
(३) सध्या शैक्षणिक प्रवेशाची प्रक्रिया सुरु असल्याने शैक्षणिक प्रकरणे खास मोहिमेद्वारे निकाली काढण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिग्रस (जि.यवतमाळ) औद्योगिक क्षेत्रात सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(११) * ७९०३ श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिग्रस (जि.यवतमाळ) शहरापासून ४ किलोमीटर अंतरावर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ४५ एकर जागेवर उद्योग उभारण्याचे घोषित केले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिर्घ कालावधी उलटूनही येथील औद्योगिक क्षेत्रात रस्ते, वीज, पाणी आदि सुविधा उपलब्ध करुन दिल्या नाहीत त्यामुळे येथील एमआयडीसी उद्योगविना बंद पडून आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती उद्योगधंदे सुरु होण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,
(५) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे. दिग्रस शहरापासून ४ कि.मी. अंतरावर सावंगा गावाजवळ १८.३२ हे. आर. इतक्या क्षेत्रावर दिग्रस लघु औद्योगिक क्षेत्र स्थापन केले आहे.

(२) दिग्रस लघु औद्योगिक क्षेत्रात पहिल्या टप्प्यात ९.११ हे. आर. जागा विकसित केली असून १.०० कि.मी. खडी मुरमाचे रस्ते व ०.४१ कि.मी. जलवितरिका उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच उद्योजकांना कुपनलिकेसाठी खोदकाम करण्याची परवानगी देण्यात आली आहे व आवश्यकतेनुसार पथदिवे व इतर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत व सदर क्षेत्रास MSEDCL कडून आवश्यकतेनुसार वीजपुरवठा उपलब्ध करण्यात आला आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील पं.वसंतराव देशपांडे सभागृहाच्या स्थितीबाबत

**(१२) * ७३४३ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरातील एकमेव सांस्कृतिक सभागृह पं.वसंतराव देशपांडे सभागृहाची स्थिती फारच खराब आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बैठक आसन व्यवस्था/मुत्रीघर/पिण्याचे पाणी व इतर अत्यावश्यक सुविधा पूरविण्याबाबत काय उपाययोजना प्रस्तावित आहे,

(३) नाट्य संस्थाना कमी दरात सभागृह उपलब्ध करुन देण्याबाबत काही निर्णय शासन घेणार आहे का,

(४) शासन यावर विशेष प्रस्ताव करुन उपाय करणार आहे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

तथापि, कांही आसने नादुरुस्त आहेत.

(२) आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध असुन नादुरुस्त आसने बदलणे प्रस्तावति आहे.

(३) व (४) शक्यता पडताळून पाहण्यात येत आहे.

-----------------

**पिक कर्जदार शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करणेबाबत**

**(१३) * ७५०३ श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ३६५५ ला दिनांक २० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात-:**
सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय रिझर्व बँकेच्या दि. ११ मे, २०१२ च्या परिपत्रकानुसार जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांनी दि. ०३ फेब्रुवारी, २०१५ च्या पत्रान्वये जिल्हा बँक आणि व्यापारी/ग्रामीण बँक यांना पिक कर्जदारांच्या ७/१२ उताऱ्यावरील कर्जाचा बोजा कमी करणेबाबत कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा मध्य.सह.बँक व इतर बँकांनी पिक कर्जदार शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील कर्जाचा बोजा अद्याप कमी केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भारतीय रिझर्व बँकेच्या परिपत्रकानुसार पिक कर्जदार शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) बीड जिल्ह्यात सहकारी आणि महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या समन्वयाने पिक कर्जदार शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील बोजा कमी करण्यासाठी शासन ठोस कार्यक्रम आखून कार्यवाही करणार आहे काय,

(५) जिल्ह्यात पात्र पिक कर्जदार शेतकऱ्यांची संख्या किती आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) अशा शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील बोजा कमी करण्याची संस्था तसेच बँक स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) सेवा सहकारी संस्थेमार्फत कर्जवाटप केलेल्या व रु. १ लाखापेक्षा कमी कर्ज असलेल्या शेतकऱ्यांच्या ७/१२ वरील कर्ज बोजा कमी करण्यासाठी संबंधीत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचे मार्फत संस्था स्तरावरुन बोजा कमी करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) सहकारी कर्जवाटप झालेल्या शेतकऱ्यांच्या ७/१२ वरील बोजा कमी करण्याची मोहिम राबविण्यात येत असून या कामी संबंधीत तलाठयाचे सहकार्य घेऊन कार्यवाही करण्यात येत आहे. व्यापारी बँकाच्या बाबतीत संबंधित जिल्हा अग्रणी बँक अधिकारी यांचे मार्फत कार्यवाही करुन घेणे अपेक्षित आहे.

(५) जिल्ह्यात पात्र पिक कर्जदार शेतकऱ्यांची संख्या ६,१४,०६३ इतकी आहे.

-----------------

**राज्यातील बाजार समितीतील आडत रद्द करण्याबाबत**

**(१४) * ८०८८ डॉ.अपूर्व हिरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.संदिप बाजोरिया, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३०५२ ला दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बाजार समितीतील आडत रद्द करणेसंदर्भात सर्व संबंधित घटकांच्या प्रतिनिधींची समिती गठीत करण्याची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, पणन संचालक, पुणे यांनी सदर समितीची कार्यकक्षा वाढविण्यासाठी केलेल्या विनंतीस अनुसरुन त्यावर अंतिम निर्णय घेण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सदरहू समितीने आपल्या शिफारशी शासनास सादर केल्या आहेत काय,

(४) असल्यास, शिफारशीचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने बाजार समितीतील आडत रद्द करणेबाबत पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) प्रस्तुत प्रकरणी अद्याप कार्यवाही पुर्ण झालेली नसल्यास, ती केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) होय.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) सदर समितीला दि.३१.७.२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यानंतर समितीचा अहवाल अपेक्षित आहे.

-----------------

**अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे प्रस्ताव महाविद्यालयाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(१५) * ६६९३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदीवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता भारत सरकार शिष्यवृत्ती तसेच शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क योजनेंतर्गत जवळपास ७५ हजार अर्ज विहित कालावधीत प्राप्त होवूनही महाविद्यालयीन स्तरावर प्रकरणे प्रलंबित आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुदतीत सादर केलेल्या अर्जानुसार मान्यता न देणाऱ्या महाविद्यालयीन अधिकाऱ्यांवर शासन कोणती कार्यवाही करणार आहे,
(३) महाविद्यालयीन स्तरावर प्रलंबित असलेल्या प्रकरणांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणीक वर्षावर परिणाम झाल्यास त्याची जबाबदारी शासन कोणावर निश्चित करणार आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात भारत सरकार शिष्यवृत्ती तसेच शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क योजनेंतर्गत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे अनुक्रमे १,५२,९६३ व ९,७४६ असे एकूण १,६२,७०९ अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी, महाविद्यालयीन स्तरावर भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेंतर्गत २४,७५६ अर्ज व शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क व परिक्षा शुल्क योजने अंतर्गत १,८३७ अर्ज प्रलंबित आहेत.
(२) प्रस्तुत योजनांचा लाभ मिळण्यासाठी विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन सादर करण्यात येणारे अर्ज/प्रस्ताव, विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र, फी संबंधी पडताळणी, महाविद्यालयांच्या व अभ्यासक्रमांच्या मॅपींग प्रक्रीयेत येणाऱ्या तांत्रिक अडचणी इ. कारणांमुळे महाविद्यालय स्तरावर प्रलंबीत आहेत.

सन २०१४-१५ या वर्षात प्रलंबित अर्जांच्या त्रुटींची पूर्तता करुन प्रकल्प स्तरावर उपलब्ध निधीतून ३१ जुलै, २०१५ अखेरपर्यंत अर्ज निकाली काढण्याबाबत प्रकल्प अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत. प्रलंबीत अर्ज निकाली काढण्याचे दृष्टीने प्रकल्प स्तरावरुन महाविद्यालयांना सूचना दिल्या जात आहेत.

विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ वेळीच मिळावा यादृष्टीने सर्व अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांच्या स्तरावर स्थानिक वृत्तपत्र, दुरदर्शन, आकाशवाणी केंद्र या प्रसादर माध्यमाद्वारे कालबध्द नियोजनासंबंधी बातमी प्रसिध्द करुन, प्रस्तुत योजनांचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विहित मुदतीत अर्ज सादर करण्याबाबत तसेच महाविद्यालयांना ऑनलाईन सादर केलेले अर्ज तपासून अद्यावत कोर्स फीसह प्रकल्प अधिकाऱ्यांकडे विहीत मुदतीत सादर करण्याबाबत जाहिर आवाहन करणेविषयी आयुक्तालयाकडून सर्व अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांना दिनांक ९ जुलै, २०१५ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) अनुसूचित जमातीचे विद्यार्थी मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण फी परिक्षा फी योजनेच्या लाभापासून वंचीत राहील्यास सबंधीत महाविद्यालय व प्रकल्प अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यातील १७ कृषि बाजार समित्यांचे ८०० गाळे भाडेपट्टयाने दिल्याने समित्यांच्या प्रमुखांवर कारवाई करण्याबाबत**

**(१६) * ७८५१ श्री.संदिप बाजोरिया, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील १७ कृषि बाजार समित्यांनी जिल्ह्यात असलेले ८०० गाळे इतर व्यवसायासाठी भाडेपट्टयाने दिल्याचे माहे मे, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार १७ कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी गाळे अन्य व्यवसायाकरिता भाडेपट्याने दिल्याप्रकरणी संबंधित समित्यांच्या प्रमुखांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कावाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही. यवतमाळ जिल्ह्यातील बाजार समित्यांकडील एकूण ६५४ भाडयाने दिलेल्या गाळयांपैकी २ गाळे शेतीपूरक व्यवसायाव्यतिरिक्त इतर व्यवसायासाठी वापरले जात आहेत.

(२), (३) व (४) होय, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांचे आदेशानुसार वर नमूद २ गाळे खाली करुन देण्याबाबत बाजार समितीने संबंधितांना नोटीस दिली होती. सदर नोटीसला मा. दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), पुसद यांनी स्थगिती दिली आहे. तसेच तत्कालीन सभापती व इतर संचालक यांचेविरुध्द कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

-----------------

**राज्यातील केंद्रीय आश्रमशाळांना अनुदान देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही**

**(१७) * ७५२५ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.सुधीर तांबे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील केंद्रीय आश्रमशाळांना अनुदान देण्यासाठी त्यांची तपासणी करुन प्रस्ताव शासनस्तरावर संचालकांनी पाठविलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचेकडून प्राप्त केंद्रिय अनुसूचित जाती आश्रमशाळांच्या तपासणी अहवालाची शासन स्तरावर छाननी करण्यात आली आहे. त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी रत्नागिरी जिल्ह्यातील कशेडी ते वेरळ या टप्प्यासाठी भूसंपादन केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत.**

**(१८) * ७१०८ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुनिल तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक ४१६१ ला दिनांक २७ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपरीकरणासाठी रत्नागिरी जिल्ह्याचे प्रवेशद्वार समजल्या जाणाऱ्या कशेडी ते वेरळ या टप्प्यासाठी भूसंपादन करण्यास सुरुवात झाली असून त्यासाठी शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन योग्य मोबदला देण्यात यावा असे निवेदन स्थानिकांनी मा. पर्यावरण मंत्री यांना दिले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीचे संपादन शासनाने केले आहे त्यांना मोबदला देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मा.पर्यावरण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे मार्फत निवेदन प्राप्त झालेले आहे, हे खरे आहे.

(२) भूसंपादन प्रक्रिया प्राथमिक टप्प्यात असून याबाबत राष्ट्रीय महामार्ग कायदा १९५६ चे तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माढा (ता.माढा, जि.सोलापूर) येथील न्यायालयाच्या इमारतीचे निकृष्ट दर्जाचे झालेले काम**

**(१९) * ७४६७ श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा (ता.माढा, जि.सोलापूर) येथील न्यायालयाच्या इमारतीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने विधी व न्याय विभागाने सदर इमारत ताब्यात घेण्यास नकार दिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीच्या बांधकामाची चौकशी दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, पुणे यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीचे बांधकाम व गुण नियंत्रण मंडळाचे कार्यकारी अभियंता हे एकच अधिकारी असल्याने या प्रकरणात कोणतीही चौकशी झाली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी इतर अधिकाऱ्यांकडून करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही. इमारतीच्या बांधकामामधील काही उणीवा दूर करण्याबाबत उपभोक्ता विभागाने मागणी केली आहे. या उणीवा दूर करण्याचे काम प्रगतीत आहे.

(२) होय.

(३) नाही.

(४) व (५) इमारत बांधकामाची तपासणी दक्षता व गुणनियंत्रण मंडळामार्फत करण्यात आली आहे. तत्संबंधी अहवालातील निष्कर्षाचा विचार करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## पुणे शहरात भूमीगत गॅस पाईपलाईन टाकण्याबाबत

**(२०) * ७९७४ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड (एमएनजीएल) या कंपनीमार्फत पुणे शहरात भूमीगत गॅस पाईपलाईन टाकण्याचे काम सुरु असून या कामात दिलेले नियम डावलून निकृष्ट दर्जाचे काम सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामामुळे भविष्यात पुणेकरांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदरहू काम चांगल्या प्रतीचे करुन कोणत्याही प्रकारे धोका निर्माण होणार नाही याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही. महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. कंपनी हे तेल, उद्योग, सुरक्षा संचालनालय, नवी दिल्ली यांनी ठरवून दिलेल्या मानकानुसार तसेच PNGRB T४S मध्ये नमूद करण्यात आलेल्या निकषाचे ही काटेकोरपणे पालन करुन गॅस पाईप लाईन टाकण्याचे काम करीत असून PNGRB/OISD/Safety Standard ला अनुसरुन सदर काम होत असल्यामुळे नागरिकांच्या जिवीतास कोणताही धोका निर्माण होणार नाही.

तथापि, प्रस्तुत विषय हा केंद्र शासनाच्या पेट्रोलियम तथा नैसर्गिक वायू मंत्रालयांतर्गत असलेल्या तेल, उद्योग व सुरक्षा संचालनालयाच्या अखत्यारीतील आहे.

(३) (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हद्दगाव (जि.नांदेड) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या**
**अनुदान वाटपात पारदर्शकता आणण्याबाबत**

**(२१) * ७०८३ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हद्दगाव (जि.नांदेड) येथे नापिकी झाल्यामुळे शासनाकडून शेतकऱ्यांना अनुदानाचा पहिला टप्पा (९० कोटी) बँकेत जमा झाला असून त्याचे वाटप जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत चालू आहे. या वाटपात साधारण शेतकऱ्यांना दुजाभाव केला जात असून बड्या शेतक-यांना घरपोच अनुदान मिळत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणाची चौकशी करुन शेतकऱ्यांच्या अनुदान वाटपात पारदर्शकता आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही,

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**बिरवाडी बालकाठी, खरवली (ता.महाड, जि.रायगड)**
**या पुलाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(२२) * ७७२१ श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिरवाडी बालकाठी, खरवली (ता.महाड, जि.रायगड) हा पुल वाहतुकीसाठी अत्यंत धोकादायक असून वाहतुकीसाठी हा एकच पुल असल्याने येत्या पावसाळ्यात वाहतुकीसाठी तो धोकादायक ठरण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,
(३) प्रश्न भाग (१) व (२) मध्ये उल्लेखित पुलाची दुरुस्ती करुन तो वाहतुकीसाठी योग्य करण्याचे दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) प्रश्न भाग (१) मधील पुलाच्या बांधकामासाठी चार वर्षापूर्वी अडीच कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय, त्यामधून पुलाच्या दुरुस्तीची कोणकोणती कामे घेण्यात आली होती ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेला पूल सुस्थितीत आहे. तथापि तो एकपदरी असल्याने वाहतुकीची कोंडी निर्माण होते. यास्तव नवीन दुपदरी पूलाचे बांधकाम प्रस्तावित असून निधी निकष व अग्रक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) सदर पूलाचे खालील बाजूस नवीन एकेरी पूल बांधण्याचे रु. २ कोटी किंमतीचे काम सन २००९-१० मध्ये अर्थसंकल्पात मंजूर झाले होते. परंतु सदर रस्त्यावरील वाहतूक वर्दळ वाढल्यामुळे दुपदरी पूल बांधण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी रु. ५.६८ कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर पुलांच्या किरकोळ दुरुस्तरसाठी रु. १५.५३ एवढा खर्च करण्यात आला आहे.

-----------------

## धुळे जिल्हयातील आदिवासी शेतकरी, शेतमजूर व पिडीत जंगल खेडूतांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत

**(२३) * ६९५१ श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ता.जि.धुळे येथील आदिवासी शेतकरी, शेतमजूर व पिडीत जंगल खेडूतांच्या विविध प्रश्नासंदर्भात संबंधित तहसिल कार्यालयावर मोर्चा काढण्यात आल्याचे दिनांक ७ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त खेडूतांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, या मागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) धुळे तालुक्यातील आदिवासी शेतकरी, शेतमजूर व पिडित जंगल खेडूतांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यांकरिता तहसिल कार्यालय, धुळे येथे मोर्चा काढला होता. या मोर्चात संबंधित १६ गावांतून ५४७ वनहक्क दाव्यांच्या संचिका सादर केल्या असून त्या वनहक्क समितीकडे तपासणीकरिता पाठविण्यात आलेल्या आहेत. वनहक्क समितीच्या तपासणीनंतर सदरचे दावे उपविभागीय स्तरीय समिती तसेच जिल्हा स्तरीय समितीकडे मंजूरीकरिता पाठविण्यात येऊन नियमातील तरतूदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**नुतनीकरण करण्यात आलेल्या मंत्रालयाच्या इमारतीत**
**आग प्रतिबंधक यंत्रणा उभारणेबाबत**

**(२४) * ८४२३ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मंत्रालयाच्या इमारतीत आग लागल्यानंतर सदर इमारत दुरुस्त करण्यात येऊन त्यामध्ये आग आटोक्यात आणण्याकरीता आवश्यक यंत्रणा न उभारल्यामुळे आजही नुतनीकरण करण्यात आलेल्या मंत्रालयाला आगीचा धोका असल्याचे एका अग्निशामक दलाच्या अधिकाऱ्यांने शासनास सूचित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंत्रालयाच्या सुरक्षेबाबत सद्य:स्थिती काय आहे,
(३) काही अघटीत घटना घडू नये याकरिता शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) मंत्रालय नुतनीकरण कामाची पाहणी मुख्य अग्निशमन अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी केली आहे. त्यांचे परीक्षणात उपस्थित झालेल्या ब-याच मुद्दयांची पुर्तता करण्यात आली असून उर्वरित मुद्दयांची पुर्तता प्रगतीत आहे.
(३) मंत्रालय नुतनीकरणात आवश्यक त्या आगप्रतिबंधक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. (पीए, हुटर, फायर अलार्म, स्प्रिंकलर्स, ड्रेंचर, हायड्रंट्स)

-----------------

## उद्योजकांकडून एमआयडीसी क्षेत्रातील काही भुखंडाचा वाणिज्य व निवासी वापरास अतिरिक्त शुल्क व दंड आकारल्याबाबत

**(२५) * ८९८० श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामगारांची रहाण्याची व्यवस्था करणे यासाठी उद्योजकांकडून एमआयडीसी क्षेत्रातील भुखंडाचा थोड्या फार प्रमाणात वाणिज्य व निवासी वापर होत असतो या कारणास्तव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने रत्नागिरी येथे लघू उद्योजकांना दंडात्मक कारवाईच्या नोटीसा पाठवून पोलीसांकरवी अटक करण्याची कार्यवाही हाती घेतल्याने या कार्यवाहीच्या निषेधार्थ एमआयडीसीतील लघू उद्योजकांनी एमआयडीसी कार्यालयावर मोर्चा नेला असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वाणिज्य व निवासी वापरास अतिरिक्त शुल्क व दंड आकारुन भुखंड नियमित करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) रत्नागिरी औद्योगिक क्षेत्रातील औदयोगिक व वाणिज्य प्रयोजनासाठी वाटप केलेल्या भूखंडाचा वापर निवासी प्रयोजनार्थ करीत आहेत. अशा भूखंडाधारकांना एम.आर.टी.पी. ॲक्टनुसार कार्यवाही करण्यासंबंधी मे-२०१५ मध्ये नोटीसा देण्यात आल्या आहेत. त्या निषेधार्थ रत्नागिरी औद्योगिक क्षेत्रातील लघु उद्योजकांनी महामंडळाच्या कार्यालयावर दि.४/६/२०१५ रोजी मोर्चा काढला होता.

(२) व (३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे ज्या उद्योजकांनी औदयोगिक व व्यापारी भूखंडाचा पुर्णत: निवासी वापर केला आहे. अशा भूखंडाधारकांना एम.आर.टी.पी. ॲक्टनुसार नोटीसा देण्यात आला आहेत. तथापि, दि.४/०६/२०१५ रोजी उद्योजाकांच्या संघटनेमार्फत महामंडळाच्या कार्यालयावर मोर्चा काढला होता. त्यावेळी उद्योजकांची छोटे-छोटे उद्योग असल्याने देखभालीची व्यवस्था करता येत नाही. तसेच उद्योजकांना निवासी भुखंड देण्यात आले नसल्याने उद्योजकांच्या ठिकाणी राहणे आवश्यक आहे. त्यामुळे महामंडळाने दंड आकारुन भुखंडाचा निवासी वापर नियमित करावा, अशी विनंती केली होती. त्यामुळे महामंडळाने भूखंडाधारकांना एक महिन्याची दिलेल्या नोटीशीची मुदत संपल्यावर औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधीसोबत पुन्हा सर्वेक्षण करुन त्यावेळी असलेल्या परिस्थितीनुसार महामंडळातर्फे पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

-----------------

**रेडी रेवस महामार्गावरील पूलाचे काम निकृष्ट दर्जाचे व प्रलंबित असल्याबाबत**

**(२६) * ९९७१ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेडी रेवस महामार्गावरील दाभोली गावात साडेतीन महिने सुरू असलेल्या छोट्या पूलाचे व मोरीचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग व ठेकेदार यांच्या दुर्लक्षामुळे धीम्यागतीने व निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ८ मे, २०१५ पर्यंत या पूलाचे बांधकाम पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात येवूनही अद्यापपर्यंत पुल वाहतुकीस सुरु करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पुलाचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) काम धिम्या गतीने सुरु आहे हे अंशत: खरे आहे. तथापि काम योग्य दर्जाचे आहे.

(२) रेलींग व इतर बाबी वगळता पुलाचे काम पूर्ण झाले असून सद्य:स्थितीत पुलावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(३) ठेकेदार यांचेकडून संथगतीने काम सुरु असल्याने दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुर्णा (जि.परभणी) येथील बौध्द विहारास अनुदान उपलब्ध करुन देणे बाबत**

**(२७) * १०२२७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ४८६ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुर्णा (जि. परभणी) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक व बौध्द विहार समितीला पर्यटक विकास प्रकल्पासाठी २.५ कोटी व यात्री निवासासाठी ५५ लक्ष रुपये निधी देण्यासाठी जिल्हाधिकारी परभणी यांनी संचालक, समाजकल्याण, पुणे यांच्याकडे शिफारस केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या शिफारशीवरुन संचालक, समाजकल्याण पुणे यांनी सचिव, सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग, मुंबई यांच्याकडे दिनांक १८ मार्च, २०११ च्या पत्रान्वये मागणी केली आहे काय,

(३) असल्यास, पुर्णा येथील बौध्द विहारासाठी संपूर्ण निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे काय,

(४) नसल्यास, निधी उपलब्ध करुन देण्याची कारणे काय आहेत, तसेच किती मुदतीत सदरील निधी बौध्द विहारासाठी वितरीत करण्यात येणारे आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

(३) नाही,

(४) पूर्णा (जि. परभणी) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक व बौध्द विहार समितीला पर्यटक विकास प्रकल्पाच्या यात्री निवासासाठी ५५ लक्ष रुपये एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला असुन, त्यामधुन सदरील काम पुर्ण झाले आहे.

ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळांचा विकास करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदाने या योजनेच्या संदर्भात अटी व शर्ती निश्चित झाल्यानंतर पुर्णा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाबाबत नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यात समाजकल्याण विभागामार्फत देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२८) * १०२५६ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात समाजकल्याण विभागामार्फत दिली जाणारी शिष्यवृत्ती या कार्यालयात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनीच त्यांचे मित्र व नातेवाईकांच्या नावे पैसे काढून शासनाची फसवणूक केल्याची बाब दिनांक ८ जून, २०१५ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर १ कोटी १७ लाख ९३ हजार रुपये इतक्या रकमेच्या अपहार प्रकरणी अद्याप कोणावरही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिष्यवृत्ती वाटपाचे काम पुणे येथील मास्टेक या कंपनीला देण्यात आलेले होते व हे काम सोलापूर येथील तीन महिलांमार्फत करण्यात येत होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या तीन महिला कर्मचारी यांनी सन २०११ पासून सन २०१५ पर्यत हा गैरप्रकार सुरु ठेवला असताना समाजकल्याण विभागातील अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय,

ई-शिष्यवृत्तीच्या कामासाठी नेमण्यात आलेले मास्टेक कंपनीचे कर्मचारी कु.सारिका द. काळे यांनी त्यांचे नातेवाईक व मित्राच्या नावाने शिष्यवृत्तीचे पैसे काढून अपहार केल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आले आहे,

(२) नाही,

सदर प्रकरणी कु.सारिका द. काळे व इतर ३२ जणांविरुध्द बझार पोलीस स्टेशन, सोलापूर येथे दिनांक ६/६/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याबाबत पोलिसांमार्फत पुढील तपास सुरु आहे.

(३) होय,

शिष्यवृत्ती वाटपासाठी ई-स्कॉलरशिप संगणक प्रणाली मास्टेक कंपनी मार्फत विकसित करण्यात आलेली आहे. सदर संगणक प्रणालीवर काम करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात मास्टेक कंपनीमार्फत कर्मचारी नेमण्यात आलेले असून सोलापूर जिल्ह्यासाठी ३ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती.

(४) नाही,

(५) व (६) सदर प्रकरणी प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, पुणे यांच्या कार्यालयातील तपासणी पथकाद्वारे चौकशी सुरु आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### पिक कर्जाची मर्यादा वाढविण्याबाबत

**(२९) * १०५५६ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकरी लाखो रुपयांची जमीन बँकेकडे तारण ठेवत असताना पिक कर्ज मात्र १५ हजार देत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच जमिनीच्या किंमतीच्या प्रमाणात कर्ज देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### कर्ण व मुकबधिरांना लोकसंख्येच्या प्रमाणात संधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३०) * १०६०९ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपंग व्यक्तींच्या एकूण लोकसंख्येपैकी तब्बल ३० टक्के लोकसंख्या (७ लाख ४० हजार) कर्ण व मुकबधिरांची असूनही त्यांना सरकारी नोक-या व योजनांमध्ये संधी मिळत नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्ण व मुकबधिरांना लोकसंख्येच्या प्रमाणात संधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या अपंग अधिनियम, १९९५ ची राज्यात सन १९९६ पासून जशीच्या तशी अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार शासकीय सेवेत अपंगाकरिता एकूण ३ टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. त्यानुसार अंध व क्षीणदृष्टी, अस्थिव्यंग तसेच कर्ण व मुकबधिर या तीन प्रवर्गातील प्रत्येकी १ टक्का आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. त्यानुसार राज्य शासनामार्फत सरकारी नोकऱ्या व योजनांमध्ये कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील २९ भू-विकास बँकेतील कर्मचारी व कर्जदारांकडील थकीत वसुलीबाबत**

**(३१) * ७५७१ डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.महादेव जानकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल तटकरे, श्रीमती स्मिता वाघ, डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आर्थिकदृष्टया अडचणीत सापडलेल्या २९ भू-विकास बँका बंद करण्यात येणार असल्याचे मा.सहकार मंत्री यांनी दिनांक १४ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास जाहिर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यासाठी मा.वित्त व मा.नियोजन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने समिती नेमली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भु-विकास बँका बंद केल्यानंतर या बॅकेतील कर्मचारी व बँकेच्या कर्जदारांकडील थकीत वसूलीबाबत तसेच इतर निर्णयाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) राज्यातील भू-विकास बँकेसंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी दि. १७.१२.२०१४ च्या शासन निर्णयान्वये मा.मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली होती, सदर उपसमितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने राज्य शासनाने १२ मे, २०१५ च्या मंत्रीमंडळ बैठकीत भू-विकास बँकेबाबत धोरणात्मक निर्णय घेतला असून त्यानुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव-चिखली ते जालना या रस्त्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(३२) * ८१४९ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव-चिखली ते जालना या रस्त्याच्या चौपदीकरण्याच्या खाजगीकरणातील दोन भागातील काम सुरु करण्याचे आदेश दिनांक ३१ मार्च २००९ रोजी देण्यात आले हे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशान्वये दिनांक ३० मार्च २०११ रोजीपर्यंत कामे पुर्ण करण्याबाबतचे आदेश असताना सुध्दा कामे पुर्ण केली नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्याच्या कामासाठी निधी मिळाला असताना तो त्या कामासाठी न वापरता इतरत्र वापरुन शासनाच्या पैशाचा गैरवापर करुन शासनाची व जनतेची फसवणूक केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या गंभीर प्रकारास जबाबदार असणाऱ्या कंत्राटदारावर दिनांक १९ डिसेंबर,२०१४ रोजी नागपूर अधिवेशनामध्ये फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे मा.मुख्यमंत्री महोदय यांनी आदेश देऊन अद्याप पर्यत संबंधित कंत्राटदारावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी गुन्हे दाखल न करण्याची कारणे काय आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

खाजगीकरणांतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव चिखली ते जालना या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम एकूण दोन प्रकल्पात मंजुर होते. यापैकी जालना ते बेराळा फाटा (भाग-१) व बेराळा फाटा ते चिखली खामगांव (भाग-२) ही कामे अनुक्रमे ३१.३.२००९ व १९.५.२०१० पासून सुरू करण्यात आली होती.

(२) अंशतः खरे आहे.

उपरोक्त जालना ते बेराळा फाटा (भाग-१) व बेराळा फाटा ते चिखली खामगांव (भाग-२) ही कामे अनुक्रमे ३१.३.२०११ व १८.५.२०१२ रोजी पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु मुळ उद्योजक भाग-१ साठी मे.के.टी.टोल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.इंदोर व मे.के.टी.बिल्डकॉन प्रा.लि.इंदोर या उद्योजकाने काम विहीत वेळेत पूर्ण केले नाही.

(३) हे खरे नाही.

खाजगीकरणाचे दोन्ही प्रकल्प सुसाध्य होण्यासाठी भाग-१ साठी शासन सहभाग ४७.२७ कोटी इतका मंजुर झाला त्यापैकी ४३.१५ कोटी मूळ उद्योजकास अदा करण्यात आले आहेत. तसेच भाग-२ साठी मंजुर शासन सहभाग रु.८५.४० कोटी मंजुर झाला व त्यापैकी रु.१७.१० कोटी मूळ उद्योजकास अदा करण्यात आले व दोन्ही प्रकल्पामध्ये सद्यःस्थितीत भाग-१ चे अंदाजे ६७% काम पूर्ण झालेले आहे व भाग-२ चे अंदाजे ३७% काम पूर्ण झालेले आहे.

(४) मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १९.१२.२०१४ रोजी विधान भवन, नागपूर येथे घेतलेल्या आढावा बैठकीत विषयांकित कामाच्या उद्योजकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याबाबत निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने सदरील प्रकरणाकरीता शासनाची अधिसुचना एपीटी-२७१४ अन्वये ॲड.अविनाश घारोटे यांची विशेष समुपदेशक पदी नियुक्ती विधी अधिकारी नियम १९८४ च्या नियम क्र.१८ नुसार करण्यात आली. त्या अनुषंगाने ॲड.अविनाश घारोटे यांना या प्रकरणाशी संबंधित सर्व करारनामे, पत्रव्यवहार व घटनाक्रम विषद करण्यात आला आहे. त्यानुसार त्यांनी आपले अभिमत दिनांक २०.१.२०१५ च्या सकृत दर्शनी (Prima fascia) मांडले की, उद्योजकावर गुन्हा दाखल करणे कायदेशिररित्या योग्य होणार नाही.

तथापी मूळ उद्योजकास दिनांक १९/१२/२०१३ रोजी शासन पत्र क्र.खाक्षेस-२००७/प्र.क्र.१२९/रस्ते-९ दिनांक १९/१२/२०१३ अन्वये काळ्या यादीत टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील शेतकऱ्यांना पीक विम्याचे पैसे मिळण्याबाबत**

**(३३) * ७६२२ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील शेतकऱ्यांनी सन २०१४ च्या खरीप हंगामात हवामानावर आधारित पिक विमा काढला होता. खरीपात अपुऱ्या पावसाने शेतकऱ्यांचे पीक उद्ध्वस्त झाले त्यामुळे जिल्हयातील एक लाख १० हजार शेतकऱ्यांची ६७ कोटी रुपयांचा पीक विमा मंजूर झाला मात्र बँक खात्यात पैसे जमा होताच जिल्हा मध्यवर्ती बँकेनेही रक्कम कर्ज खात्यात वळती केली तब्बल १ लाख ३ हजार शेतकऱ्यांचे ४७ कोटी रुपये कर्जात वळते करण्यात आले असल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान, निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकीकडे जिल्ह्यात आत्महत्येचे प्रमाण वाढत असतांना पीक विम्याचे पैसे कर्जात वळते केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे, याबाबत शासन शेतकऱ्यांना विम्याचे पैसे परत करणार आहे काय,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या, यवतमाळ या बँकेला हवामान आधारीत पीक विमा खरीप २०१४ ची एकूण सभासद १,२४,३३९ शेतकऱ्यांकरीता रु.४७२५.७९ लाख एवढी नुकसान भरपाई प्राप्त झाली होती.

यापोटी बँकेने संस्थेचे १,०१,३३१ कर्जदार सभासदांची विक विमा प्रिमीयमची रक्कम रु.१२०५.६५ लाख संस्थेचे कर्ज खाते नावे टाकून विमा कंपनीस अदा केली होती व अशा कर्जदार सभासदांची नुकसान भरपाई रक्कम रु.३९२०.६३ लाख बँकेने ज्या खात्याला प्रिमीयम नावे टाकण्यात आली त्याच कर्ज खाते जमा केली आहे. बिगर कर्जदार सभासदांची नुकसान भरपाईची रक्कम रु.८०५.१६ लाख बँकेने २३८९४ सभासदांचे बचत ठेव खाते जमा केली आहे.

(२) व (३) नाही

यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने हवामानावर आधारीत पीक विमा योजना ही कर्जदार सभासदास सक्तीची असून सदर सभासदांचे प्रिमीयम ची रक्कम बँकेने संस्थेचे कर्ज खाते नावे टाकून विमा कंपनीस अदा केली आहे. त्यामुळे कर्जदार सभासदांची नुकसान भरपाई रक्कम ज्या खात्याला प्रिमीयम नावे टाकण्यात आली तेच कर्ज खाते जमा करण्याबाबत बँकेकडून निर्णय घेण्यात आला आहे.

-----------------

### उल्हासनगर (जि.ठाणे) कॅंप नं.५, प्रेमनगर टेकडी येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहाची झालेली दुरवस्था

**(३४) * ९९९८ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) कॅंप नं.५ प्रेमनगर टेकडी येथे ३.६५ हेक्टर म्हणजेच सुमारे १३ एकराच्या भूखंडावर सार्वजनिक बांधकाम विभागाने २० ते २५ वर्षापूर्वी शासकीय विश्रामगृह बांधले आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर विश्रामगृहाची वेळोवेळी देखभाल न झाल्याने वाताहत होवून चहूबाजूंनी झोपड्यांचा विळखा पडला असून या ठिकाणी शेजारील नागरिक व भूमाफीया भूखंडाची संरक्षक भिंत तोडून अवैधपणे झोपड्या उभ्या करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू शासकीय मालमत्तेचे देखाभालीविना नुकसान होत असल्याने, ही मालमत्ता सुरक्षित व संरक्षित करण्यासाठी शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) विश्रामगृहाचा वापर होत असल्याने शासनाच्या दि. १२.१०.१९९८ च्या आदेशान्वये वापर बंद करण्यात आला. विश्रामगृहाच्या चारीबाजूने झोपडपट्टी असल्याने त्यांच्याकडून अतिक्रमण करण्याचा प्रयत्न होत आहे, हे खरे आहे,
(३) विश्रामगृहातील साहित्य सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंबरनाथ विश्रामगृहांमध्ये हलविण्यात येवून विश्रामगृहांची जागा इतर शासकीय कार्यालयाच्या वापराकरीता देण्यासाठी इतर शासकीय कार्यालयांशी पत्रव्यवहार सुरु आहे.
(४) विश्रामगृहांच्या जागेची कार्यालयाच्या वापराकरीता मागणी झाल्यास त्यानुसार पुढील कार्यवाही तातडीने करण्यात येईल.

-----------------

## राज्यात अपंगांना समान संधी, समान हक्क व हक्काचे संरक्षण देण्यासाठी अपंग धोरण ठरवण्याबाबत

**(३५) * ९६८१ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात १९९५ मध्ये अपंगांना समान संधी, समान हक्क व हक्काचे संरक्षण देण्यासाठी अपंग अधिनियम अस्तित्वात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास त्यानंतर सन २००० मध्ये अपंग आयुक्तालय अस्तित्वात येऊन सन २००१ मध्ये अपंग कल्याण कृती आराखडा तयार करण्यात आला परंतू अपंगांचे धोरण अस्तित्वात नसल्याने आजपावेता त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास या प्रकरणी शासन तातडीने लक्ष घालून अपंग धोरण ठरविणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय अशंतः खरे आहे. अपंगांना समान संधी, समान हक्क व हक्कांचे संरक्षण देण्यासाठी राज्यात अपंग अधिनियमाची अंमलबजावणी १९९६ पासून करण्यात येत आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

अपंगाचे धोरण अस्तित्वात आणण्याची कार्यवाही सुरु आहे. महाराष्ट्र राज्य अपंग कल्याण कृती आराखडा - २००१ ची अंमलबजावणी करण्यात येत असून, अपंग सक्षमीकरण धोरणाचा मसुदा मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मक्केपल्ली (माल) (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) या गावाचा आदिवासी उपयोजनेत समावेश करण्याबाबत**

**(३६) * ९७८२ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मक्केपल्ली (माल) (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) या गावाची लोकसंख्या एकूण १३६९ असून त्यापैकी अनु.जाती ७०, अनु.जमाती ७१ व इतर १२२८ लोकसंख्या असताना आदिवासी उपयोजनेत समाविष्ठ नसल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावाची इतर समाजाची संख्या एकूण १२२८ असून ग्रामपंचायत ठराव पारीत करुन आदिवासी उपयोजनेतून वगळण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २६ एप्रिल, २०१५ रोजी उपसरपंच ग्रा.पं. मक्केपल्ली (माल) यांनी लेखी पत्र दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गाव आदिवासी उपयोजनेतून वगळण्यांत येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

मक्केपल्ली (माल) हे गाव चामोर्शी तालुक्याचा आदिवासी उपयोजना क्षेत्रात समाविष्ट आहे.

(२) उपसरपंच, ग्रामपंचायत मक्केपल्ली यांचे दि. २६ एप्रिल, २०१५ चे निवेदन प्राप्त झाले नाही. तथापि, त्याच विषयावरील दि. २५ मे, २०१५ रोजीच्या फॅक्सद्वारे प्राप्त झालेल्या निवेदनाची प्रत प्राप्त झालेली आहे.

(३) व (४) जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार यांच्या पत्र क्र. एफ नं.१७०१९/३/२०१३-सी ॲन्ड एल एम-१, दि. २६/११/२०१३ नुसार एखादे गाव आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये समाविष्ट करणे किंवा वगळणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे. यासंदर्भात आवश्यक प्रस्ताव मागविण्यात येऊन पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**नाशिक जिल्ह्यातील इगतपुरीसह राज्यात पाच क्रिडा प्रबोधिनी स्थापन करण्याबाबत**

**(३७) * ८०४१ श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३४७५ ला दिनांक २९ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील नंदुरबार, इगतपुरीसह राज्यात पाच क्रिडा प्रबोधिनी स्थापन करण्यास माहे ऑगस्ट, २००९ मध्ये आदिवासी विकास विभाग तसेच दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजी मा.आदिवासी विकास मंत्री यांनी देखील मंजुरी दिली असून देखील माहे मे, २०१५ पर्यंत सदर प्रबोधिनींची स्थापना झालेली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जमातीच्या मुलांच्या क्रिडा गुणांना चालना देणे व क्रिडा विषयक सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी उक्त क्रिडा प्रबोधिनी तातडीने स्थापन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) आदिवासी विकास विभागाने पाच क्रीडा प्रबोधिनी स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला नाही. परंतु, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, दि.२४.०८.२००९ अन्वये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता नंदुरबार येथे मध्यवर्ती क्रीडा केंद्र व इगतपुरी, जि.नाशिक येथे क्रिडा प्रबोधिनी स्थापन करण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे. याप्रकरणी बांधकामाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(२) क्रीडा प्रबोधिनी प्रत्यक्ष कार्यरत होण्यापूर्वी चालू शैक्षणिक वर्षात तात्पुरत्या स्वरुपात शालेय शिक्षण विभागाच्या, विभागीय क्रीडा संकुल, नाशिक येथे अनुसूचित जमातीच्या निवडक मुलांना प्रशिक्षण देण्याकरिता कार्यवाही सुरु आहे. त्यानुषंगाने आदिवासी आश्रमशाळांकडून विविध खेळांकरिता प्रशिक्षण देण्यासाठी ९४ मुलींची निवड करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे आर्णि (जि.यवतमाळ) येथील**
**निवासी शाळेच्या स्थलांतराबाबत**

**(३८) * ९२८५ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आर्णि (जि.यवतमाळ) येथील अ.जा.य. निवासी शाळा आर्णी वेचून (दिग्रस) ईसापूर येथे स्थलांतरीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळेतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गैरसोय होवू नये तसेच शिक्षकांचे समायोजन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

मौजे आर्णि, जि.यवतमाळ येथे मंजूर करण्यात आलेल्या शासकीय निवासी शाळेसाठी सर्व सोयीसुविधांनी युक्त इमारत उपलब्ध न झाल्याने सदर निवासी शाळा तात्पुरत्या स्वरुपात ईसापूर, ता.दिग्रस, जि.यवतमाळ येथील शासकीय निवासी शाळेच्या इमारतीत स्थलांतरीत करण्यात आली आहे.

अनुसूचित जाती मुलांची शासकीय निवासी शाळा, मौजे आर्णि, जि.यवतमाळ या शाळेसाठी भंडारी, ता.आर्णी, जि.यवतमाळ येथे जमीन उपलब्ध झालेली असून तेथे निवासी शाळेसाठी शासकीय इमारतीचे बांधकाम सुरु आहे. बांधकाम पूर्ण होऊन इमारत ताब्यात मिळाल्यानंतर सदर ठिकाणी निवासी शाळा सुरु करण्यात येईल.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) ईसापूर, ता.दिग्रस, जि.यवतमाळ येथील शासकीय निवासी शाळा व तेथे स्थलांतरीत करण्यात आलेली मौजे आर्णी, जि.यवतमाळ येथील शासकीय निवासी शाळा, या दोन्ही निवासी शाळांसाठी स्वतंत्र शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग कार्यरत आहे. त्यामुळे, विद्यार्थ्यांच्या अध्यापनाबाबत कोणतीही गैरसोय निर्माण झालेली नाही. तसेच, शिक्षकांच्या समायोजनाबाबतही कोणताही प्रश्न निर्माण झालेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बीड जिल्ह्यातील श्रावणबाळ, संजय गांधी निराधार योजनेतील पात्र लाभार्थ्यांना अनुदान देण्याबाबत**

**(३९) * १०२३४ श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील श्रावणबाळ, संजय गांधी निराधार योजनेतील पात्र लाभार्थ्यांना माहे फेब्रुवारी, २०१५ पासून अनुदानाचे वाटप करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मंत्री विशेष सहाय्य यांनी विधान परिषद सभागृहात अर्थसंकल्पीय अधिवेशन दरम्यान दर महिन्याच्या १ तारखेला अनुदानाचे वाटप करण्यात येणार असल्याचे आश्वासित केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांना अनुदानाचे वाटप करण्यासाठी झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत,

(४) निराधारांना अनुदानापासून वंचित ठेवल्याबाबत दोषींविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) बीड जिल्ह्यात ११ तालुके असुन केज परळी, वडवली व गेवराई या तालुक्यातील विशेष सहाय्य योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना जून, २०१५ पर्यंत अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

तसेच, पाटोदा, आष्टी, शिरुर, अंबाजोगाई, माझलगाव व धारुर या तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांना माहे मे, २०१५ पर्यंत अनुदानाचे वाटप करण्यात आले असून जून, २०१५ ची देयके कोषागारात सादर करण्याची कार्यवाही चालू आहे.

बीड तालुक्यातील लाभार्थ्यांना एप्रिल, २०१५ पर्यंत अनुदानाचे वाटप केलेले असून माहे मे व जून, २०१५ ची देयके कोषागारात सादर करण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालेगांव (जि.नाशिक) येथील या यंत्रमाग वस्त्रोद्योगास चालना देण्यासाठी केंद्र पुरस्कृत पायलट प्रोजेक्ट राबविणेबाबत

**(४०) * ९८७५ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ८०९ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साध्या यंत्रमागाचा दर्जा उंचावण्यासाठी Instiu Upgradation of Plain Powerloom for S.S.I.Sector ही केंद्र पुरस्कृत योजना विविध राज्यात राबविली जात असून सदर योजनेंतर्गत राज्य शासनानेही सहभाग घेवून दिनांक २८ एप्रिल, २०१४ रोजी शासननिर्णयान्वये राज्य शासनाने योजना मंजुर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत योजनेंतर्गत वस्त्र आयुक्त, भारत सरकार, मुंबई यांचेकडे मालेगांव येथील ३४० युनिटचे २६९२ साधे यंत्रमागाचे आधुनिकीकरण करण्यासाठीचे अर्ज प्राप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु योजनेमध्ये केंद्र शासनाने मालेगांव व नागपूर या कलस्टरचा समावेश केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मालेगांव येथील यंत्रमागांचे आधुनिकीकरणासंबंधी प्राप्त प्रस्तावांना मान्यता देण्यात आलेली आहे काय,

(५) नसल्यास, प्रश्न भाग (२) मध्ये नमुद यंत्रमागांना आधुनिकीकरणासाठी केव्हापर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) वस्त्र आयुक्त, केंद्र शासन, मुंबई यांचेकडे सन २०१४-१५ मध्ये मालेगांव येथील ३४० अर्जाअन्वये २६९२ साधे यंत्रमागाचे आधुनिकीकरण करण्यासाठी अर्ज प्राप्त झाले असून त्यास त्यांनी मान्यता दिलेली आहे.

(५) सदर योजना केंद्र पुरस्कृत असल्याने केंद्र शासनाद्वारे अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिल्यानंतर राज्य शासनाकडून उपलब्ध तरतुदीप्रमाणे संबंधित प्रस्तावांना अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येईल.

-----------------

**अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील अलिबाग-रेवदंडा मार्गावरील नवेदरबेली पुलाच्या दुरुस्तीबाबत**

**(४१) * ६६९४ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३८९० ला दिनांक २० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात-:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील अलिबाग-रेवदंडा मार्गावरील नवेदरबेली या ठिकाणच्या पुलाचे रेलिंग नादुरुस्त झाले असून सदर दुरुस्तीचे काम मंजूर असून कामाची निविदा निश्चित झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुरुस्तीच्या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम किती आहे,

(३) असल्यास, कामाची निविदा निश्चित करुन पावसाळयापूर्वी सदर दुरुस्तीचे काम सुरु करण्याच्यादृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) रस्त्याच्या कामाची अंदाजपत्रकीय किंमत रुपये १.६२ लक्ष इतकी आहे.

(३) कामाची निविदा निश्चित झाली असून काम हाती घेवून पूर्ण करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**साखर उद्योगाचा पुढील दहा वर्षाचा रोडमॅप करण्याबाबतच्या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत**

**(४२) * ९२४२ श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना विश्वासात घेवूनच साखर उद्योगाचा पुढील दहा वर्षाचा रोडमॅप तयार करण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे एप्रिल, २०१५ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या साखर उद्योगाच्या रोडमॅपचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, याबाबतची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही, तथापि, साखर उद्योगाचा पुढील दहा वर्षाचा रोडमॅप तयार करण्याबाबत वसंतदादा साखर संस्था, मांजरी (बु.) पुणे येथे दि.२५ व २६ एप्रिल, २०१५ रोजी झालेल्या साखर परिषदेमधील सातव्या चर्चासत्रामध्ये मा.मंत्री (सहकार) यांचे अध्यक्षतेखाली चर्चा झालेली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर २४ तास नियंत्रण कक्ष स्थापन करणेबाबत**

**(४३) * ८६६७ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर पनवेल ते इंदापूर टप्प्यात मोठमोठे खड्डे पडले असून पावसाळ्यापुर्वी या रस्त्यांची दुरूस्ती करणे आवश्यक असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महामार्गावर होणारी वाहतुकीची कोंडी, अपघात, अतिवृष्टी इत्यादी अडचण येवू नये या करिता महामार्गावर २४ तास नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्ता दुरुस्त करण्याबाबत तसेच येथे २४ तास नियंत्रण कक्ष स्थापन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, याबाबत कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.
रस्त्याच्या दुरुस्तीचे काम या प्रकल्पाच्या सवलतदाराकडून प्रगती पथावर आहे.
(२) व (३) सद्य:स्थितीत रस्ता दुरुस्ती व सुरक्षाविषयक देखरेख सातत्याने केली जात आहे. तथापि, प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर सवलतदाराने वाहतुक मदत केंद्र स्थापन करण्याची बाब निविदेत समाविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील व्यवस्थापन शास्त्र विभागाच्या २८ मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सन २०१४-१५ ची शिष्यवृत्ती नाकारल्याबाबत**

**(४४) * ७४४७ श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) विद्यार्थ्यांचा प्रवेश नसल्याचे कारण दाखवुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील व्यवस्थापन शास्त्र विभागाच्या २८ मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सन २०१४-१५ ची शिष्यवृत्ती (DTE) तंत्रशिक्षण संचालनालयाने नाकारली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, (DTE) ने शिष्यवृत्ती नाकारल्याने गरीब कुटुंबातील विद्यार्थी आर्थिक अडचणीत आले असून शिक्षणापासून वंचीत राहण्याची शक्यता नाकारता येत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व सदर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यासाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील व्यवस्थापन शास्त्र विभागाच्या २८ मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी संस्थास्तरावर (Institute Level) प्रवेश घेतला असल्याचे तंत्रशिक्षण संचालनाकडून प्राप्त यादीतून निदर्शनास आले आहे. विभागाच्या दिनांक ३० मार्च, २०१५ च्या शासन निर्णयानुसार केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीयेद्वारे (CPA) प्रवेशित विद्यार्थ्यांनाच शिष्यवृत्ती, शैक्षणिक प्रतिपूर्ती देय असल्याने सदर २८ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे आवेदनपत्र फेटाळण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दिग्रस (ब्रु) (ता.कंधार, जि.नांदेड) येथील रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(४५) * ८९२७ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिग्रस (ब्रु) (ता.कंधार, जि.नांदेड) येथील नागरिक, शेतकरी व कर्मचारी दिग्रस व जांब (ब्रु) रस्त्याचा वापर करीत असुन या रस्ताची दुरवस्था झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरातील जळकोट व जांब येथील मार्केट यार्डात आडत दुकानाची संख्या मोठी असल्याने शेतकऱ्यांची सतत वर्दळ असून सदरहू रस्त्याची दुरवस्था झाल्याने नागरिकांची प्रामुख्याने शेतकरी, व्यापारी, नागरिक व कर्मचारी यांची गैरसोय होत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

प्रश्नाधिन रस्त्याची लांबी २९ कि.मी.असुन त्यापैकी २४ कि.मी .लांबी वाहतुकीस योग्य आहे. उर्वरीत खराब रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबतच्या सूचना क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

(३) व (४) निधीच्या उपलब्धतेनुसार नादुरुस्त रस्त्याची दुरुस्ती करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## राज्यातील महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या ३५० कर्मचाऱ्यांना जानेवारी, २०१५ पासूनचे वेतन देण्याबाबत

**(४६) * १०३७८ श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या ३५० कर्मचाऱ्यांना माहे जानेवारी, २०१५ पासून वेतन मिळालेले नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे,

(३) अद्याप, चौकशी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांना त्यांचे वेतन देण्याच्यादृष्टीने शासनाने काय उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) महाराष्ट्र राज्य सहकारी संघाला यापूर्वी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ६८ व नियम ५३ नुसार राज्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांकडून शिक्षणनिधीचे स्वरुपात अंशदान प्राप्त होत होते. दिनांक १४.२.२०१३ रोजी झालेल्या सहकारी कायद्यातील दुरुस्तीमुळे शिक्षणनिधी मिळणे बंद झाले आहे. महाराष्ट्र राज्य

सहकारी संघाला शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रम, वाड्.मय विक्री व नियतकालीके वर्गणी यामधुन अत्यंत तुटपुंजे उत्पन्न प्राप्त होत आहे. तसेच शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रमालाही सहकारी संस्थांचा योग्य प्रतिसाद मिळत नाही.

(३) अद्याप चौकशी झालेली नाही. अधिसूचित करण्यात आलेल्या संस्थांना प्रशिक्षणासाठी निधी मिळण्याकरीता दर निश्चित करण्याबाबतची अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) महाराष्ट्र राज्य सहकारी संघाला शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे जास्तीत जास्त उत्पन्न मिळावे याकरिता सहायक निबंधक, जिल्हा उपनिबंधक व विभागीय सह निबंधक यांना सहकार आयुक्त व निबंधक यांनी शिक्षण प्रशिक्षणाचे उद्दिष्ट दिले असून दिनांक १५.५.२०१५ चे पत्रान्वये शिक्षण कार्यक्रम घेणेबाबत सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

-----------------

## महाड (जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये वायुगळती होऊन चार कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत

**(४७) * १०६९८ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि. रायगड) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये दिनांक १८ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास बेकायदा भंगार गोदामामध्ये रासायनिक टाकी फुटून झालेल्या वायुगळतीमध्ये चार कामगारांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ड-१२ क्रमांकाच्या प्लॉट मध्ये अधिराज इंडस्ट्रीज लि. नावाची कंपनी १२ वर्षापासून बंद होती व त्या ठिकाणी रावगेत नावाच्या इसमाने बेकायदा भंगार व्यवसाय सुरु केल्याने तेथे रसायन जमिनीवर सांडून पाण्यात मिसळल्याने विषारी वायु निर्माण होवून काही कामगार बेशुध्द झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच मृत कर्मचाऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने भूखंड क्र. D १२ हा श्रीम.ज्योती नितीन भोले यांना वाटप केलेला असून, सदर भूखंडावर कोणतेही बांधकाम करण्यात आलेले

नाही. तथापि, अधिराज इंडस्ट्रिज लि. या कंपनीस भूखंड क्र. ई-१२ या भूखंडाचे Di Butyl Pthalate, Di- Octyl Pthalate & Naphtol या उत्पादनासाठी वाटप केले होते. तथापि, सदरचा उद्योग १२ वर्षापासून बंद होता व अधिराज कंपनी यांनी महामंडळाची परवानगी न घेता सदरचा भूखंड श्री.शकील इकबाल खान यांना गोडाऊनसाठी भाडे तत्वावर दिनांक ०५/०३/२०१३ च्या करारनाम्यानद्वारे दिला असले निदर्शनास आले आहे. या भुखंडाचा वापर भंगार गोडाऊन म्हणून होत असताना टेम्पोमधून ५ कामगार केमिकल ड्रम उतरवित असताना त्यातील एक ड्रम लिकेज झाल्याने सदरची दुर्घटना घडली आहे. हे खरे आहे.

(३) सदर घटनेबाबत एमआयडीसी महाड पोलीस ठाणे येथे श्री.शकील इकबाल खान (भंगार गोडाऊन मालक) व श्री.अशोक विश्वनाथ हिरेमठ (अॅस्टेक कंपनीमालक), श्री.विवेक रामचंद्र थोरात (पर्सनल मॅनेजन) यांच्या विरुध्द गु.र.क्र.४९/२०१५ हा भादंविस कलम ३०४,३४ अन्वये नोदविण्यात आला असून, पुढील तपास सुरु आहे. तसेच अधिराज कंपनीने सदर भूखंड करारनामा करुन भाडेतत्वावर दिलेला आहे व त्यास महामंडळाची मान्यता न घेतल्यामुळे सदर भूखंड परत घेण्याची कारवाई महामंडळाकडून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) येथे जिल्हा रुग्णालय आवारात सार्वजनिक शौचालये व स्नानगृहाच्या बांधकामाबाबत

**(४८) * १०५२१ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, अॅड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) येथे जिल्हा रुग्णालय आवारात सार्वजनिक शौचालये व स्नानगृहाचे बांधकाम न करताच हे काम पूर्ण झाल्याचे पत्र देऊन सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग अनुदान हडपण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिनांक १२ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मार्च, २०१४ मध्ये निवडणूकीची आचारसंहिता सुरु असल्याने या कामासाठी निविदा प्रसिध्द करता येत नसल्याने हा निधी बांधकाम विभागाने जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे वर्ग केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४-१५ मध्ये हे काम पूर्ण झाले असून त्या संबंधीचा निधी परत बांधकाम विभागाकडे वर्ग करावा अशाही सूचना कार्यकारी अभियंता यांनी दिल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा प्रकारे काम न करता अनुदान हडपण्याचे प्रकार अलिबाग, सार्वजनिक बांधकाम विभागात यापूर्वीही घडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय. काम चालु आर्थिक वर्षामध्ये सुरु होऊन निधी खर्च करता येईल, याकरिता निधीची मागणी केली होती.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सावंतवाडीतील मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहात**
**सोयीसुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(४९) * १०६११ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावंतवाडीतील (जि.सिंधुदुर्ग) मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहात राहणा-या मुलींना निकृष्ट दर्जाचा आहार, अपुऱ्या सोयीसुविधा व शिस्तीच्या नावाखाली विद्यार्थीनीवर अन्याय होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांना सातबारा कोरा करण्याचे, लागवड खर्च अधिक ५० टक्के नफा हमीभाव देण्याबाबत**

**(५०) * ७५८२ डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना सातबारा कोरा करण्याचे, लागवड खर्च अधिक ५० टक्के नफा हमीभाव देण्याच्या आश्वासनाचा केंद्र व राज्य शासनाला विसर पडला असल्याने आता कर्ज मुक्तीसाठी शेतकऱ्यांनी सर्व पक्ष, पंथ व विचार सोडून करा वा मारा असे टोकाचे आंदोलन सुरु करण्याची घोषणा शेतकरी नेते व विदर्भ जनआंदोलन समितीचे संयोजक यांनी दिनांक २ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेती विकास व तणावग्रस्त शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी कर्जमुक्ती व हमीभाव वाढ या गरजापूर्तीसाठी आवश्यक असलेली दिशा, धोरणे राबविण्यास शासन अपयशी झाल्यामुळे शेतकरी आत्महत्या वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात ६० वर्षावरील शेतकऱ्यांना पाच हजार पेन्शन देण्याबाबत शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने शेतकऱ्यांचे प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत तसेच, शेतकऱ्यांना पेन्शन योजना सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे,

(५) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) कर्जमुक्तीसाठी आंदोलन सुरू करण्याची घोषणा शेतकरी नेते व विदर्भ जनआंदोलन समितीचे संयोजक यांनी दिनांक २ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास केली असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

राज्यातील शेतकऱ्यावरील कर्जाचा बोजा कमी करण्याच्या दृष्टीने विदर्भ व मराठवाडा या भागातील शेतकऱ्यांनी परवानाधारक सावकाराकडून घेतलेले कर्ज सुमारे १७१.३० कोटी माफ करण्याबाबत दिनांक १०.४.२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या जिल्ह्यात सदर कर्जमाफी योजनेची अंमलबजावणी सुरू आहे.

राज्यातील शेतकऱ्यांनी भू-विकास बँकेकडून घेतलेल्या कर्जावरील व्याजात सूट देण्याच्या दृष्टीने एकरकमी परतफेड योजनेस दिनांक ३१.३.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेण्यात आला असून याबाबतचा शासन निर्णय लवकरच निर्गमित करण्यात येईल. या निर्णयामुळे सुमारे ३७७६६ शेतकऱ्यांना रुपये ७१३ कोटी एवढ्या रकमेची सूट मिळणार आहे.

(२) केंद्रीय कृषी मुल्य व किंमत आयोग पिकांच्या किमान आधारभूत किंमतीची शिफारस केंद्र शासनाकडे करते व त्याआधारे केंद्र शासन राष्ट्रीय पातळीवर शेतमालाच्या किंमती निश्चित करते. याबाबत राज्य शासनाच्या स्तरावर निर्णय घेतला जात नाही.

(३) शेतकऱ्यांना पेन्शन देण्याचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) राज्यातील शेतक-यावरील कर्जाचा बोजा कमी करण्याच्या दृष्टीने विदर्भ व मराठवाडा या भागातील शेतक-यांनी परवानाधारक सावकाराकडून घेतलेले कर्ज सुमारे १७१.३० कोटी माफ करण्याबाबत दिनांक १०.४.२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या जिल्ह्यात सदर कर्जमाफी योजनेची अंमलबजावणी सुरू आहे.

राज्यातील शेतकऱ्यांनी भू-विकास बँकेकडून घेतलेल्या कर्जावरील व्याजात सूट देण्याच्या दृष्टीने एकरकमी परतफेड योजनेस दिनांक ३२.३.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेण्यात आला असून याबाबतचा शासन निर्णय लवकरच निर्गमित करण्यात येईल. या निर्णयामुळे सुमारे ३७७६६ शेतकऱ्यांना रुपये ७१३ कोटी एवढ्या रकमेची सूट मिळणार आहे.

शेतकऱ्यांना पेन्शन देण्याचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खामगांव (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथे महाराणा केबल नेटवर्क यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत अनधिकृतपणे सिमेंटचे खांब उभारल्याबाबत

**(५१) * ८१५६ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४०४९ ला दिनांक १० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात -:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (ता.खामगांव, जि.बुलढाणा) परिसरात महाराणा केबल नेटवर्कचे प्रचंड जाळे पसरले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खामगांव-जलंब-माटरगांव रस्ता, खामगांव-पिंपळगाव राजा रस्ता, खामगांव ते बुलढाणा रस्ता, खामगांव ते शेगांव रस्ता, व खामगांव ते चिखली रस्ता (या सर्व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यांच्या कडेला) सिमेंट पोल अनधिकृतपणे तसेच विनापरवाना टाकले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गंभीर बाब लोकप्रतिनिधींनी लक्षवेधी सुचनेद्वारे सभागृहात मांडून सुध्दा अद्याप पर्यत सदर खांब काढण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर खांब काढण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरीष्ठ अधिकारी दिरंगाई करत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) होय.

प्रश्नांकित पाच रस्त्यापैकी खामगांव ते चिखला या रस्त्यावरील हिवरखेड ते गणेशपूर ह्या १० कि.मी.च्या रस्ता लांबीमध्ये महाराजा केबल नेटवर्कला कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलढाणा यांनी परवानगी दिली आहे.

उर्वरित ४ रस्त्यांवरील अनधिकृतपणे केबल टाकण्यासाठी उभारण्यात आलेले पोल व केबल काढून टाकण्यात आले आहेत.
(३) नाही.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) येथे शासकीय निवासी आश्रमशाळा व वसतिगृहे यासाठी पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत

**(५२) * १०४२९ श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) येथे सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय निवासी आश्रमशाळा व वसतिगृहे या इमारतीचे बांधकाम करण्यात आले असून तेथील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पाण्याची सुविधा नसल्यामुळे आश्रमशाळा व वसतिगृहासाठी पाणीपुरवठा योजना त्वरीत सुरु करण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे, जि.अमरावती यांना दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आश्रमशाळा व वसतीगृहास तातडीने पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) येथे सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय निवासी आश्रमशाळा व वसतीगहांच्या इमारतींना पाणीपुरवठा जोडणीकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण योजना, अमरावती यांचेकडे रु.३४,४८,९००/- चा धनादेश जमा करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नागपूर विभागातील बालविकास अपंग, मतिमंद शाळेच्या वसतिगृहात आवश्यक सोयी-सुविधा व सुरक्षेचा अभाव असल्याबाबत

**(५३) * ९६८७ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते : तारांकित प्रश्न क्रमांक २६७६ ला दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात:**
सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागपूर विभागांतर्गत असलेल्या अपंग, मतिमंद शाळांच्या वसतिगृहांमध्ये मुलींसाठी शौचालय, स्नानगृह यांची दयनिय अवस्था झाली असून या ठिकाणी असलेल्या मुलींकरिता आवश्यक ती सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे बलात्कारासारखे गुन्हे घडत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलींच्या वसतिगृहाची प्रत्यक्ष पाहणी करुन शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) मुलींना सुरक्षा प्रदान करण्याच्या दृष्टीने शासन तातडीने दखल घेऊन उपाययोजना करणार आहे काय ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) राज्यातील नागपूर विभागांतर्गत असलेल्या अपंग मतिमंद, शाळेच्या वसतिगृहामध्ये मुलींसाठी शौचालय, स्नानगृह यांची दयनीय अवस्था झाल्याने गुन्हे घडत आहेत हे खरे नाही.

तथापि, नागपूर येथील शासकीय अपंग बालविकास गृहामध्ये मुलीच्या आईने दिलेल्यात तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला, हे खरे आहे.

(२) होय.

(३) मुलींना सुरक्षा प्रदान करण्यासाठी शासन कटीबध्द असून बालगृह येथील मुलीच्या सुरक्षेचा प्रश्न विचारात घेऊन शासकीय बाल विकास गृह येथील कार्यरत पुरुष काळजी

वाहकांच्या बदल्यात महिला काळजी वाहकाची तसेच महिला स्वयंपाकी व महिला मदतनीस यांची व्यवस्था तातडीने करण्यात आलेली आहे. मुलींचे शयनकक्ष खालच्या माळयावर आरक्षित केले असून, काळजीवाहकांचे चोवीस तास लक्ष राहिल अशी व्यवस्था काण्यात आलेली आहे. पूर्वी असलेल्या व्यवस्थेप्रमाणे शौचालय व स्नानगृहाची वेगळी व्यवस्था पुढेही चालू ठेवण्यात आलेली आहे. तसेच जिल्हा समाजकल्याण कार्यालयाकडून सुरक्षेसंबंधात कार्यरत अधिक्षकांना दरमहा आढावा घेऊन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

-----------------

## घुग्घुस-वणी (जि.चंद्रपूर) मार्गावरील वर्धा नदीच्या पूलावरील डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(५४) * ९७९२ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत घुग्घुस-वणी मार्गावरील वर्धा नदीच्या बेलोरा पूलावर सन २०१४-२०१५ या वर्षात डांबरीकरणाचे काम करण्यात येवून दिड महिन्यात सदर पुलावर खड्डे पडल्याचे दिनांक ९ मे, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

कोळशाच्या जड वाहतुकीमुळे तसेच रस्त्यावर पडलेल्या कोळशाच्या भुकटीचा थर उडू नये म्हणून वे.को.लि. तर्फे रस्त्यावर सतत पाणी टाकण्यात येत असल्यामुळे सदरहु रस्ता क्षतीग्रस्त होऊन किरकोळ प्रमाणात खड्डे पडलेले आहेत.

(२) दोष दायित्व कालावधी असल्यामुळे सदर रस्त्याची दुरुस्ती कंत्राटदारांमार्फत स्व:खर्चाने करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील पाच मागासवर्गीय आर्थिक महामंडळांकरिता**
**२५८ कोटी रुपयांच्या कर्ज हमीबाबत**

**(५५) * ९३३६ श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ३४६० ला दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पाच मागासवर्गीय आर्थिक महामंडळांकरिता २५८ कोटी रुपयांच्या कर्ज हमीबाबत काढलेल्या शासन निर्णय रद्द करण्यात आल्याची बाब दिनांक १६ ऑक्टोबर, २०१४ रोजी निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसचे सदर महामंडळांना केंद्रिय महामंडळाकडून ५५० कोटीच्या वाढीव कर्जाला हमी देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने प्रस्ताव सादर केलेला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील सामाजिक व आर्थिक मागासवर्गातील युवकांना स्वयंपुर्ण करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, सदर शासन निर्णय अनावधानाने या विभागामार्फत निर्गमित करण्यात आलेला होता. तथापि, सदरचा शासन निर्णय रद्द करुन सुधारित शासन निर्णय वित्त विभागामार्फत निर्गमित झालेला आहे.

(२) होय, हे अशंत: खरे असून या विभागांतर्गत कार्यरत ५ मागासवर्गीय व १ अपंग महामंडळांकरीता केंद्रीय महामंडळाकडून रु.५५५.०० कोटीचा प्रस्ताव वित्त विभागाला सादर करण्यात आला होता.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही, तथापि राज्यातील सामाजिक व आर्थिक मागासवर्गातील युवकांना स्वयंपूर्ण करण्यासाठी कार्यरत ६ महामंडळांकडून स्वयंरोजगाराच्या विविध योजनांतर्गत पुरवठा करण्यात येतो.

-----------------

**थकित असलेल्या शेतकऱ्यांना कर्ज मिळण्याबाबत**

**(५६) * १०५३९ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.राहुल नार्वेकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ज्या शेतकऱ्यांची कर्जे थकीत आहेत त्या शेतकऱ्यांची कर्जे वसूल करण्यास मनाई असतांना यवतमाळ जिल्ह्यात बँकांनी कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांच्या नावाचे फलक लावले असून सुरु असलेल्या हंगामासाठी सदर शेतकऱ्यांना कर्जे मंजूर करीत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या सुरु असलेल्या हंगामासाठी कर्जे मिळावीत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने मोठया थकीत सभासदांच्या कर्ज वसुलीच्या कार्यवाही करता थकीत सभासदांच्या याद्या बँकेत लावल्या होत्या हे खरे आहे. तथापि सन २०१४-१५ मधील जिल्ह्याच्या दुष्काळी परिस्थितीचा विचार करुन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांनी सूचित केल्याप्रमाणे बँकेने थकीत सभासदांच्या याद्या काढून टाकल्या आहेत. सन २०१३-१४ पूर्वीच्या थकीत सभासदांनी त्यांचेकडील थकीत कर्जाची परतफेड केल्यास अशा सभासदांना सन २०१५-१६ करीता बँकेमार्फत पिककर्ज वाटप करण्यात येत आहे.

(२) सन २०१४-१५ चे पीक कर्ज ज्या शेतकऱ्यांनी दुष्काळी परिस्थितीमध्ये भरणा केले नाही अशा शेतकऱ्यांच्या कर्जाचे रुपांतर करण्यात येऊन त्यांना चालु हंगाम सन २०१५-१६ मध्ये पीक कर्ज वाटप करण्याबाबतच्या सुचना बँकेस देण्यात आलेल्या आहेत. तसेच सन २०१३-१४ चे रुपांतर कर्जापोटी राज्यशासनाच्या हिश्याची रक्कम रु.१६७८ लाख राज्य शासनाने वितरित केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या महाविद्यालयातील प्राध्यापकांना नियमित वेतन देण्याबाबत

**(५७) * ९८९९ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ५६९८ ला दिनांक २७ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत शासन निर्णय दिनांक २६ जून, २००८ व दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ अन्वये आश्रमशाळेच्या १४८ कनिष्ठ महाविद्यालयांना मान्यता देण्यांत आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांना उच्चाधिकार समितीची मान्यता नसल्याने त्यांना वेतन अदा करता आलेले नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उच्चाधिकार समितीने दिलेल्या निर्देशानुसार सदरचा प्रस्ताव मा.मुख्यमंत्री व मा.वित्त मंत्री यांच्या मान्यतेने उच्चाधिकार समितीस फेर सादर करण्यांत आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त फेर प्रस्तावास उच्चाधिकार समितीची मान्यता प्राप्त झाली आहे काय,

(५) असल्यास, आश्रमशाळांना श्रेणीवाढीने जोडण्यात आलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यात आले आहेत काय,

(६) नसल्यास, उच्चाधिकार समितीस सादर फेरप्रस्तावास मान्यता न मिळणेचे कारण काय आहे व ती केव्हापर्यंत मिळणे अपेक्षित आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२), (३), (४), (५) व (६) १४८ विभाजन उच्च माध्यमिक आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदनिर्मितीचा व वेतनाचा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीच्या विचारार्थ सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावासंदर्भात उच्चस्तरीय समितीने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या माहितीसह प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**मौजे धारणी (जि.अमरावती) येथील नायब तहसिलदार व कर्मचारी यांनी संजय गांधी निराधार योजने अंतर्गत केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(५८) * ६७०९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोजे धारणी (जि. अमरावती) येथे संजय गांधी निराधार योजनेच्या शेकडो बोगस लाभार्थींना आर्थिक लाभ देणाऱ्या नायब तहसिलदार श्री.पी.पी. सोळके यांचे विरुध्द पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोगस व्यक्तिंना पात्र दाखवून शासनाचे लाखो रूपयांचे नुकसान संबंधित नायब तहसिलदार व कर्मचारी यांनी गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाची फसवणूक व गैरव्यवहार करणाऱ्या नायब तहसिलदार व कर्मचारी यांचेकडून वितरीत केलेली रक्कम वसूल करणे व त्यांचेवर कारवाई करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) श्री.पी.पी. सोळंके, नायब तहसिलदार यांचेविरुद्ध पोलीस स्टेशन धारणी, जि.अमरावती येथे भारतीय दंड विधान नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच, त्यांना निलंबित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे श्री.फरकुंडे, अव्वल कारकून, श्री.तोडेवाड, कनिष्ठ लिपीक व कु.ठेंग, कनिष्ठ लिपिक यांचेविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी विभागीय चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषी असल्याचे आढळून आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडून योग्य ती वसुलीची कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**राज्यात दिवसेंदिवस वाढणारी वाहनांची संख्या व वाढत्या अपघाताचे प्रमाण**

**(५९) * ९२६८ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिवसेंदिवस वाढणारी वाहनांची संख्या व वाढत्या अपघाताचे प्रमाण लक्षात घेता दोन जिल्ह्यांना जोडणारे राज्य रस्ते हे चौपदरी करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(३) उक्त प्रकरणी अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुखेड (जि.नांदेड) येथील मुखेड-बा-हाळी-डोरनाळी या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(६०) * ८९२८ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड (जि.नांदेड) येथील मुखेड-बा-हाळी-डोरनाळी हा रस्ता खड्डेमय झाला असून या रस्त्यावरुन वाहन चालविणे जिकरीचे झाले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या खड्ड्यामुळे या रस्त्यावर अनेक अपघात झाले असुन बा-हाळी-डोरनाळी रस्ता मागील अनेक वर्षापासून दुरुस्त न करता केवळ मुरुम टाकून खड्डे टाकून बुजविण्यात आला आहे, मात्र पावसाच्या पाण्याने मुरुम वाहून जावून खड्डे जैसे थे असल्याने वाहनचालकांना वाहन चालवितांना मोठी कसरत करावी लागत आहे हे पाहता शासन काय कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
मुखेड ते बाऱ्हाळी या २०.३० कि.मी लांबीतील खड्डे भरुन तात्पुरती दुरुस्ती केली असून रस्ता वाहतूकीस सुस्थितीत आहे. उर्वरित बाऱ्हाळी ते डोरनाळी हया ७.०० कि.मी लांबीतील दुरुस्तीचे काम मंजूर असुन निधीच्या उपलब्धतेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील साखरेवरील आयात शुल्क ४० टक्क्यांपर्यंत वाढवून इथेनॉलवरील अबकारी शुल्क रद्द करण्याबाबत

**(६१) * १०५६२ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी साखरेवरील आयात शुल्क ४० टक्क्यांपर्यत वाढविण्याचा तसेच इथेनॉलवरील अबकारी शुल्क रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना थकबाकीची रक्कम देण्यासाठी शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही. प्रश्नाधीन बाब केंद्र शासनाशी निगडीत असल्याने मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या दि.१४ जानेवारी, २०१५ रोजीच्या पत्रान्वये साखरेवरील ४०% आयात शुल्क वाढविण्याबाबत केंद्र शासनास विनंती केलेली आहे.

इथेनॉलवरील अबकारी शुल्क रद्द करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या विचाराधीन नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि शेतकऱ्यांना एफ.आर.पी.ची रक्कम देण्यासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

अ) राज्य शासनाने सन २०१३-१४ व २०१४-१५ च्या हंगामातील ऊस खरेदी कर माफ केलेला आहे.

ब) केंद्र शासनाने सन २०१४-१५ साठी दि.२३/६/२०१५ चे अधिसूचनेन्वये रु.६०००/- कोटीचे पॅकेज जाहीर केलेले असून, त्यामधून राज्याला अंदाजे रु.१९८२/- कोटी मिळणे अपेक्षित आहे.

क) केंद्र शासनाने दि.२७/२/२०१५ च्या अधिसूचनेनुसार कच्च्या साखरेच्या निर्यातीसाठी रु.४०००/- प्र.मे.टन अनुदान देण्याचा निर्णय घेतला असून, अनुदानाचा वापर एफ.आर.पी.ची रक्कम शेतकऱ्यांना देण्यासाठीच करणे बंधनकारक आहे.

ड) केंद्र शासनाच्या दि.२७/२/२०१५ च्या अधिसूचनेच्या धर्तीवर राज्य शासनाने कच्च्या साखर निर्यातीस रु.१०००/- प्र.मे.टन प्रोत्साहन रक्कम देण्याचा निर्णय घेतला आहे.

(४) लागू नाही.

-----------------

**सिंदी विशाल विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित (ता.सेलू, जि.वर्धा) या संस्थेने रासायनिक खत व बियाणांचे वाटप करताना केलेला गैरव्यवहार**

**(६२) * १०७०५ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदी विशाल विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित सिंदी, र. नं. २७३ सिंदी (रेल्वे) (ता.सेलू,जि.वर्धा) येथील शेतकऱ्यांना रासायनिक खत व बियाणे वाटप करताना गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी माहे मार्च, २०१५ मध्ये जिल्हा उपनिबंधक, वर्धा व सेलू, तालुका उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे लोकप्रतिनिधींनी तसेच नागरिकांनी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेच्या गोदामातील रासायनिक खते व बियाणांचा साठा कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधित संस्थेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

(३) व (४) प्राथमिक चौकशीनुसार बियाणे व खत विक्री मध्ये रु.९,५५,४४०/- रुपयांचा अपहार झाल्याचे निदर्शनास आलेले असुन सदर अपहारास संस्थेचे कर्मचारी श्री. चांदेकर हे जबाबदार असल्याचे दिसुन आल्यामुळे संस्थेने त्यांना दि.१५/५/२०१५ पासून निलंबित केलेले आहे. सदर प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कृषी उत्पन्न बाजार समिती, बोदवड (जि.जळगांव) संचालक मंडळाने मागील दहा वर्षामध्ये एकही वार्षिक सर्वसाधारण सभा न घेतल्याबाबत**

**(६३) * १०७६४ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी उत्पन्न बाजार समिती, बोदवड (जि.जळगांव) संचालक मंडळाने गेल्या दहा वर्षामध्ये एकही वार्षिक सर्वसाधारण सभा घेतली नसल्याची व झालेल्या जमाखर्चाची माहिती व्यापारी, हमाल, सहकारी संस्था, त्यांचे प्रतिनिधी यांना दिली नसल्याची बाब जून, २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फळ विक्री खरेदी संस्था, वरणगांव यांना बोदवड बाजार समितीने ९९ वर्षाच्या करारावर दिलेली जागा त्यांनी संबंधित संचालक मंडळाच्या नातेवाईकांना बेकायदेशीररित्या ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भाडेतत्वाच्या जागेवर व्यापारी संकुल बांधून त्याचे गाळे बेकायदेशीररित्या विक्री करण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याच बाजार समितीच्या अंतर्गत उपबाजार समिती, मुक्ताई नगर येथे सुध्दा शेतमाल विक्री व खरेदी मार्केट फी व पावत्यामध्ये मोठया प्रमाणात अनियमितता करुन भ्रष्टाचार झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) नाही. बाजार समितीने सदरची जागा फळ विक्री खरेदी संस्था, वरणगांव यांना ९९ वर्षाच्या करारावर दिलेली नसून दि.१.७.१९८० रोजी ३० वर्षासाठी भाडेपट्टा करारावर दिलेली होती.त्यानंतर सदरची जागा बाजार समितीने अन्य ७ व्यक्तींना ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने दिली आहे. सदर व्यक्ती या संचालकांचे नातेवाईक आहेत किंवा कसे व सदर व्यवहार नियमानुसार झाला आहे किंवा कसे याबाबत पडताळणी सुरु आहे.

(३) नाही. सदर जागेवर ३३ गाळयांचे बांधकाम सुरु केले असून अद्याप विक्री झालेली नाही.

(४) अद्याप, तशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जुन्नर तालुक्यातील (जि.पुणे) रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(६४) * १०६१२ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर तालुक्यातील (जि. पुणे) रस्त्यांची अवस्था अतिशय दयनिय झाली असल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विभागाचे या कामाकडे दुर्लक्ष होत असल्याने रस्त्यातील खड्डयातून प्रवास करताना जनतेचा जीव मेटाकूटीस येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्यांची दुरवस्था बिकट होत असूनही याकडे अक्षम्य दुर्लक्ष करणाऱ्या विभागातील संबंधितांबाबत नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करणार आहे,

(५) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) जुन्नर तालुक्यातील जुन्नर अखत्यारित रस्त्याची एकूण लांबी ४६२.५८ कि.मी. आहे. त्यापैकी जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडून १३६.७० कि.मी. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सन २०१३ मध्ये वर्ग करण्यात आलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील मूळ लांबी ३२५.८८ कि.मी. मध्ये डांबरी पद्धतीने खड्डे भरुन रस्ता सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. जिल्हा परिषदेमार्फत हस्तांतरीत झालेल्या एकूण १३६.७० कि.मी. लांबी मोठ्या प्रमाणात खराब झालेले आहे. अशा लांबीतील दुरूस्ती खडी व मुरुमाने केली जाते.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.